महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/इनोव्हेशन चॅलेंज/२०२३/ 3450 दिनांक : 07 AUG 2023

## परिपत्रक

प्रति,
प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय :- "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत..**

**संदर्भ :- १.** शासन पत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग क्र. मनासो-२०२३/प्र.क्र. ११८/कौशल्य -२, दिनांक २६ जुलै, २०२३.
२. संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/इनोव्हेशन चॅलेंज/२०२३/२०२/ दि. २८ जुलै २०२३.

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभांतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यता स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आले असून, सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरीता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत **"महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज"** चे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**कृ.मा.प.**

या उपक्रमाचे अनावरण दिनांक १५ जुलै, २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांचया हस्ते करण्यांत आले असून, राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

**या उपक्रमाचे प्रस्तावित वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै-१५ ऑगस्ट,२०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट-३१ऑगस्ट,२०२३ |
| संस्था स्तरावर सादरीकरणासाठी सत्र | १० सप्टेंबर- २० सप्टेंबर, २०२३ |
| संस्था निहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर, २०२३, |
| **दुसरा टप्पा :** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर, २०२३ |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर-५ ऑक्टोबर,२०२३ |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर-१५ ऑक्टोबर, २०२३ |
| प्रत्येक जिल्हयातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर, २०२३ |
| **तिसरा टप्पा :** | |
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूखांना सूचित करण्यात येते की, या उपक्रतात आपल्या संस्थांमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा. तसेच सदर उपक्रमाबाबत जास्तीत जास्त संस्थांनी सहभाग नोंदविणे आवश्यक असून, सहभागाबाबतचा अहवाल वेळोवेळी info.dteropune@gmail.com या ई-मेलवर सादर करावा.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/इनोव्हेशन चॅलेंज /२०२३/२०२ दिनांक : 28 JUL 2023

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

विषय : "महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत...

संदर्भ : शासन पत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग क्र. मनासो-२०२३/प्र.क्र.११८/कौशल्य-२, दिनांक २६ जुलै, २०२३

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागांतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यांत आले असून, सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजवणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत **"महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंज"**चे आयोजन करण्यांत येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या उपक्रमाचे अनावरण दिनांक १५ जुलै, २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यांत आले असून, राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

या उपक्रमाचे प्रस्तावित वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड | |
|---|---|
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै — १५ ऑगस्ट, २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट — ३१ ऑगस्ट, २०२३ |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर — २० सप्टेंबर, २०२३ |
| संस्था निहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर, २०२३ |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 31 JUL 2023 आवक क्र. 0303

| | |
|---|---|
| **दुसरा टप्पा :** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर, २०२३ |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर — ५ ऑक्टोबर, २०२३ |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर — १५ ऑक्टोबर, २०२३ |
| प्रत्येक जिल्ह्यातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर, २०२३ |
| **तिसरा टप्पा :** | |
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित संस्थांना या उपक्रमाबाबत अवगत करुन या उपक्रमात सदर संस्थांमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देण्याबाबतच्या सूचना द्याव्यात. तसेच सदर उपक्रमाबाबत जास्तीत जास्त संस्थांनी सहभाग नोंदविणे आवश्यक असून, संस्थांच्या सहभागाबाबतचा वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत यावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.